# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २६/२०१२-१३/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. संगाप्पा महादेव निवर्गी,<br>मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संगाप्पा महादेव निवर्गी, मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांच्यामार्फत अनुसूची ' अ ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २०.६.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. ५७५ मध्ये ५ अश्वशक्ती वीज जोडणीसाठी वितरण कंपनीकडे चलन रु. ५०००/- पावती क्र. ०२०९८०४ ने दि. १४.१०.२०११ रोजी भरले आहे. ग्राहकाने दि. १३.१०.२०११ रोजी चाचणी अहवाला दिलेला आहे. कृती मानकानुसार लघुदाब वाहिनी विस्तर असलेने ३ महिन्यात वीज जोडणी मिळाणे आवश्यक होते. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १३.४.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ७.६.२०१२ ला आदेश दिले त्यामध्ये कृती मानकानुसार विहित कालावधीत वीज पुरवठा द्यावा अन्यथा विलंबापोटी नुकसान भरपाई द्यावी असा आदेश दिला आहे. मंचाकडून अपेक्षित मदत - एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणेचा आदेश व्हावा, विलंब किती झालेला आहे हे निश्चित झालेस व मंचाने दिलेल्या आदेशानुसारच्या कालावधीत वीज जोडणी न मिळाल्यास ग्राहक भरपाई मागणेचा अधिकार तक्रारदारास आहे हे निश्चित व्हावे अशी मागणी केली आहे. अर्जासोबत चलन भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ९.७.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने ५ अश्वशक्ती शेतीपंप वीज जोडणीसाठी अर्ज केल्याचे व दि. १४.१०.२०११ रोजी चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. सदर कनेक्शनसाठी लघुदाब वाहिनी ०.२४ कि.मी. लागते व त्याचा मंजुरी क्रमांक ईई/केएम/एसपीए/९५००२७/११-१२ असा आहे. तसेच ३१ मार्च २०११ पर्यंत पैसे भरुन चाचणी अहवाल दिलेले एकूण २८१ ग्राहक आहेत. म.रा. विद्युत नियामक आयोग ( विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच इतर अटी ) विनियम २००५ कलम ४.४ अन्वये ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वावर सदर ग्राहकांना वीज पुरवठा देण्याचे काम चालू आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २६.७.२०१२ रोजी सुनावणीस घेण्यात आली. मंचाचे सदस्य सचिव पायभूत आराखडा (Infrastructure Pl.) विभागाच्या कामासाठी बेंगलोर येथे गेल्याने सदरच्या सुनावणीस हजर नाहीत. प्रस्तुत सुनावणीचेवेळी ग्राहक गैरहजर, प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे संख उप विभागाचे अधिकारी श्री. माणिक पेठे, कवठे महांकाळ विभागाचे श्री. एस.बी. पाटील, कनिष्ठ अभियंता, श्री. लांडगे, सहाय्यक लेखापाल उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी असे प्रतिपादन केले की, वि.प.ने आपल्या लेखी अहवालात विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्या इतर अटी विनियम २००५ च्या तरतुदी लागू केल्यास मा. आयोगाने मंजूर केलेले कृती मानके विनियम बाजूला ठेवावे लागतील, त्यामुळे विद्युत कायदा २००३ कलम ४३ व कृती मानके विनिमय २००५ मधील कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश देऊ शकतो असा युक्तीवाद केला. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ४ पोलचे काम आहे, टी.सी. मंजूर आहे, ग्राहकास दि. ३०.८.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात ३१ मार्च २०११ पर्यंत पैसे भरुन चाचणी अहवाला दिलेले एकूण २८१ ग्राहक आहेत असे म्हटले आहे. श्री. खापरे यांनी वि.प.ने ग्राहकास जर दि. ३०.८.२०१२ पर्यंत वीज जोडणी दिली तर ग्राहक भरपाईची मागणी सोडून देत आहे, तसे ग्राहकास कळवित आहे असे मंचासमोर सांगितले.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.विरुध्द करणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार ग्राहकाने चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य आहे. लघुदाब वाहिनी विस्तार असल्याने ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते. अंतर्गत कक्षाने कृती मानकानुसार विहित कालावधीत वीज पुरवठा द्यावा अन्यथा विलंबापोटी नुकसान भरपाई द्यावी असा आदेश दिला आहे. श्री. पाटील यांनी मंचासमोर ग्राहकाने विलंबापोटी भरपाई मागितलेली नाही असे सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु ग्राहकाने भरपाई मागण्याचा अधिकार आहे हे निश्चित व्हावे (declare) अशी मागणी केली आहे. अंतर्गत कक्षाने तसे आदेश दिले आहेत. वि.प.ने लेखी अहवालात ३१ मार्च २०११ पर्यंत पैसे भरुन चाचणी अहवाल दिलेले एकूण २८१ ग्राहक आहेत. विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ कलम ४.४ अन्वये ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वावर सदर ग्राहकांना वीज पुरवठा देण्याचे काम चालू आहे असे म्हटले आहे. कलम ४.४ ची तरतूद पहातां,

Unless the Act or the rules and regulations framed there under or any other law for the time being in force requires otherwise, the Distribution Licensee shall release connections in each tariff category, <u>as far as practicable, on " First come, first served " basis</u>.

Provided, that the Distribution Licensee may follow any other basis for release of connections under any special scheme of the Distribution Licensee, subject to the <u>Distribution Licensee's duty to give supply within the time period under Section 43 of the Act</u> and the regulations specified there under.

यावरुन व तसेच ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ चे कलम ८.२ नुसार मंच तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदत दूर करण्याचे आदेश देऊ शकतो. त्यामुळे वि.प.चा बचाव ३१ मार्च २०११ पर्यंत पैसे भरुन चाचणी अहवाल दिलेले एकूण २८१ ग्राहक आहेत व ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वावर सदर ग्राहकांना वीज पुरवठा देण्याचे काम चालू आहे, यामुळे ग्राहकाची ठराविक मुदतीत वीज जोडणी देण्याची मागणी नाकारता येणार नाही / फेटाळता येणार नाही. असो. वि.प.च्या स्थानिक अधिकाऱ्यांनी दि. ३०.८.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्याचे मान्य केले आहे. ग्राहकाने प्रतिनिधी श्री. खापरे यांनी दि. ३०.८.२०१२ पर्यंत वीज जोडणी दिल्यास भरपाईची मागणी सोडून देत आहे, तसे ग्राहकास कळवित आहे असे सांगितले. मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय ' असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यांची शेती गट क्र. ५७५ मध्ये ५ अश्वशक्ती वीज जोडणी दि. ३०.८.२०१२ पर्यंत द्यावी व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) ग्राहकाने वि.प.विरुध्द विलंबापोटी भरपाई मागणीचा हक्क सोडून दिला आहे, त्यामुळे भरपाईचे वेगळे आदेश करण्याची आवश्यकता नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com